# राष्ट्रीय सेवा योजना विभाग

## नियमित उपक्रम 2024-25

राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडे शैक्षणिक वर्ष 2024 - 25 करिता 100 विद्यार्थी प्रवेशित झाले आहेत. या विभागामार्फत 6 जून रोजी पर्यावरण दिनानिमित्त संस्था अध्यक्ष श्री मनोहरजी खापणे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले यावेळी नारळ आंबा अशा पन्नास रोपांची लागण करण्यात आली . 21 जून रोजी प्रा. एन.जी. देवन यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. 18 जुलै रोजी विद्यापीठ स्थापना दिनानिमित्त वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी जांभूळ फणस, कोकम अशा दीडशे रोपांची लागण करण्यात आली . 26 जुलै रोजी रस्त्यावर पडलेले झाड विद्यार्थ्यांनी तोडून बाजूला करून रस्ता मोकळा केला. टी डब्लू जे ट्रेडविजाझ यांच्या संयुक्त विद्यमाने दोन ऑगस्ट रोजी दोनशे रोपांचे वृक्षारोपण करण्यात आले. रायपाटण तंटामुक्त समितीचे अध्यक्ष 4 ऑगस्ट रोजी जुन्या वह्यातील कागद संकलन करून नवीन वह्या बनवण्यात आल्या.श्री प्रभाकर पळसुलेदेसाई यांच्या मार्गदर्शनाखाली ज्येष्ठाशी हितगुज हा कार्यक्रम पाच ऑगस्ट रोजी घेण्यात आला. झाले.राजापूरच्या नायब तहसीलदार सौ. शेळके मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली आठ ऑगस्ट रोजी युवा संवाद हा कार्यक्रम घेण्यात आला. 13 ऑगस्ट रोजी तिरंगा रॅली काढण्यात आली. 14 ऑगस्ट रोजी दत्तक गाव येरडव येथे स्वच्छता करण्यात आली. 15 ऑगस्ट रोजी हर घर तिरंगा उपक्रमांतर्गत माजी सैनिक श्री सिताराम पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी स्वतंत्रता शपथ घेण्यात आली. 30 ऑगस्ट रोजी प्लॅनिंग सेशन टीबीके महाविद्यालय खेड येथे संपन्न दिनांक 17 सप्टेंबर ते 2 ऑक्टोंबर या काळात 'स्वच्छता ही सेवा' हा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमांतर्गत सावर्डा कॉलेजचे प्राचार्य प्रा.टी.वाय.कांबळे यांचे व्याख्यान संपन्न झाले. या उपक्रमांतर्गत रायपाटण, हरळ, पाचल बाजारपेठेत स्वच्छता करण्यात आली. याबरोबरच पथनाट्य, रॅली , गटचर्चा,व्याख्यान असे विविध उपक्रम संपन्न झाले. दोन ऑक्टोंबर रोजी पाचल बाजारपेठेत स्वच्छता करण्यात आली यावेळी विद्यार्थ्यांनी दोन गाडी कचरा गोळा केला. शुभम गोरुले यांने सात ते 17 नोव्हेंबर पर्यंत अमरावती येथे झालेला राज्यस्तरीय आव्हान कॅम्प पूर्ण केला. त्याबरोबरच दीक्षा गांगण व निसर्गा धावडे यांनी लांजा येथील एलटीपी कॅम्प पूर्ण केला. 19 ऑक्टोबर रोजी मतदार जनजागृतीपर उपक्रम घेण्यात आले. एक डिसेंबर ते 7 डिसेंबर या कालावधीतील एड्स सप्ताह अंतर्गत व्याख्यान,निबंध स्पर्धा,,गटचर्चा जनजागृतीपर पत्रक वाटप असे विविध उपक्रम घेण्यात आले. 10 जानेवारी रोजी वह्या बनवण्यात आल्या. या दिवशी हिमोग्लोबिन व रक्तगट तपासणी शिबिर संपन्न झाले. वह्यांचे वाटप जिजामाता हायस्कूल रायपाटण येथे 11 जानेवारी रोजी करण्यात आले. 16 जानेवारी रोजी सार्वजनिक आरोग्य तपासणी शिबिर संपन्न झाले. 22 जानेवारी रोजी उपप्रादेशिक परिवहन कार्यालय रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात आले. यावेळी 20 विद्यार्थ्यांना हेल्मेट वाटप करण्यात आले.25 जानेवारी मतदार दिनानिमित्त चित्रकला स्पर्धा,रांगोळी स्पर्धा, मतदार शपथ आदी उपक्रम घेण्यात आले. 30 जानेवारी रोजी राजापूर लांजा नागरिक संघ आयोजित ग्रामीण साहित्य संमेलनाची ज्योत पाचल बाजारपेठेतून ठरवण्यात आली. एक फेब्रुवारी रोजी उगवाई मंदिर परिसरात स्वच्छता करण्यात आली. असे विविध उपक्रम वर्षभरात घेण्यात आले.